# पोलीस अधीक्षककार्यालय, सातारा

## (स्थानिक गुन्हे शाखा, सातारा)

दुरध्वनीक्रमांक- ०२१६२-२३३१२३ फॅक्सक्रमांक - ०२१६२-२३०२३२

वेबसाईट - www.satarapolice.gov.in मेल आय डी - pilcb.satara@mahapolice.gov.in


प्रेसनोट दिनांक १९/१०/२०२२

**(स्थानिक गुन्हे शाखा, सातारा यांची कारवाई)**

**(दुर्गादेवी उत्सवात रासदांडीयामध्ये हवेत गोळीबार करुन दहशत माजवणारे पोलीस अभिलेखावरील आरोपींना अटक करुन त्यांचेकडुन दोन देशी बनावटीची पिस्टल, ३ मॅक्झीनसह दोन जिवंत काडतुसे जप्त.)**

५ ऑक्टोबर २०२२ रोजी रात्री १२.३० वा. चे सुमारास मंगळवार पेठ सातारा , मनामती चौक येथे असणारे सेंट पॉल हायस्कुल येथे झालेल्या बाचाबाचीवरुन चिडुन जावुन पोलीस अभिलेखावरील आरोपी अमिर सलिम शेख रा.हनुमान मंदिरा शेजारी वनवासवाडी, कृष्णानगर सातारा, अभिषेक उर्फ अबू राजू भिसे, रा.काळे वस्ती, निकीबंटस हॉटेलच्या पाठीमागे, मोळाचा ओढा सातारा, साहिल विजय सावंत, रा. शाहुपूरी पोलीस टाण्याचे समोर, आकाशवाणी झोपडपट्टी सातारा यांनी दोन मोटर सायकलवरुन येऊन अमीर शेख याने फिर्यादी यांना तुम्हाला सुट्टी देत नाही, तुला आज जिवंत ठेवत नाही असे म्हणुन त्याचे जवळ असणारे पिस्तुलातुन फिर्यादी यांचे दिशेने गोळी झाडली. फिर्यादी खाली वाकल्याने गोळीचा नेम चुकला तसेच साक्षीदार सचिन श्रीपाद घडशी हे अमीर शेख यास असे करु नको असे सांगत असताना अमीर शेख याने सचिन श्रीपाद घडशी यांचे डोक्याला पिस्तुल लावुन शुट करतो असे बोलला त्यावेळी अभिजीत भिसे, साहील सावंत यांनी त्याला ओरडुन ठोक असे म्हणाले व त्यांचे सोबत असणारा यश साळुंखे हा हातात लांब कोयता घेऊन फिर्यादी यांना मारण्यासाठी धावुन आला म्हणुन वगैरे दिले फिर्यादीवरुन शाहुपूरी पोलीस टाणे गु.र.नं.३२२/२०२२ भादविक ३०७, १४३, १४७, १४८, १४९ सह भा.ह.अ.क. ३, ४, २५, २७, म.पो.अ.क.३७(१)/१३५ अन्वये नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्हयातील पोलीस अभिलेखावरील आरोपी अभिषेक उर्फ अबू राजू भिसे, रा.काळे वस्ती, निकीबंटस हॉटेलच्या पाठीमागे, मोळाचा ओढा सातारा, अमिर सलिम शेख रा.हनुमान मंदिरा शेजारी वनवासवाडी, कृष्णानगर सातारा, साहिल विजय सावंत, रा.शाहुपूरी पोलीस टाण्याचे समोर, आकाशवाणी झोपडपट्टी सातारा हे गुन्हा घडलेपासुन फरारी होते. नमुद गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन फरारी आरोपींना ताब्यात घेण्याबाबत श्री.अजय कुमार बंसल, पोलीस अधीक्षक सातारा व श्री.अजित बोऱ्हाडे, अपर पोलीस अधीक्षक, सातारा यांनी श्री.अरुण देवकर, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, सातारा यांना सुचना दिल्या. त्याप्रमाणे त्यांनी श्री.रमेश गर्जे, सहायक पोलीस निरीक्षक, व अमित पाटील, पोलीस उप-निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, सातारा यांच्या अधिपत्याखाली एक विशेष पथक तयार केले.

दिनांक १८ ऑक्टोबर २०२२ रोजी श्री. अरुण देवकर, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा,सातारा यांना त्यांचे गोपनिय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, शाहुपूरी पोलीस टाणे गु.र.नं. ३२२/२०२२ भादविक ३०७, १४३, १४७, १४८, १४९ सह भा.ह.अ.क. ३, ४, २५, २७, म.पो.अ.क.३७(१)/१३५ मधील आरोपी हे संग्राम विजय जाधव, रा. आदर्श विहार अपार्टमेंट वनवासवाडी सातारा याचे घरी लपुन बसले आहेत. त्याप्रमाणे त्यांनी तपास पथकास नमुद आरोपींना ताब्यात घेण्याच्या सुचना दिल्या. तपास पथकाने प्राप्त झाले बातमीचे ठिकाणी जाऊन संग्राम विजय जाधव याचे घरातुन नमुद गुन्हयात फरारी असलेले आरोपी अभिषेक उर्फ अबू राजू भिसे, रा.काळे वस्ती, निकी बंटस हॉटेलच्या पाठीमागे, मोळाचा ओढा सातारा, अमिर सलिम शेख रा.हनुमान मंदिरा शेजारी वनवासवाडी, कृष्णानगर सातारा, साहिल विजय सावंत, रा.शाहुपूरी पोलीस टाण्याचे समोर, आकाशवाणी झोपडपट्टी सातारा यांना ताब्यात घेवून त्यांना पुढील तपासकामी शाहुपूरी पोलीस टाण्याचे ताब्यात देण्यात आले आहे. गुन्हयाचे तपासी अंमलदार श्री.संजय पतंगे पोलीस निरीक्षक यांनी नमुद आरोपींचेकडे तपास करुन त्यांचेकडून २ देशी बनावटीची पिस्टल, तीन मॅग्झीन व २ जिवंत काडतुसे जप्त

श्री.अजय कुमार बंसल पोलीस अधीक्षक, सातारा व श्री.अजित बोऱ्हाडे अपर पोलीस अधीक्षक, सातारा यांचे सूचना प्रमाणे व श्री. अरुण देवकर, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, सातारा यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर, रमेश गर्जे, पोलीस उपनिरीक्षक अमित पाटील, पोलीस अंमलदार संतोष सपकाळ, शरद बेबले, लक्ष्मण जगधने, प्रविण फडतरे, गणेश कापरे, निलेश काटकर, मोहन पवार, विक्रम पिसाळ, पृथ्वीराज जाधव, रोहित निकम, सचिन ससाणे, विशाल पवार, वैभव सावंत, यशोमती काकडे, ज्योती शिंदे यांनी सदरची कारवाई केलेली असुन कारवाईत सहभागी अधिकारी व अंमलदार यांचे श्री.अजय कुमार बंसल पोलीस अधीक्षक सातारा व श्री.अजित बोऱ्हाडे अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी अभिनंदन केलेले आहे.

---

पोलीस अधीक्षक सातारा, करीता

प्रति-

सर्व संपादक,


सोसायटीकडे